# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :— www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.

प्रत्र क्र.रासेयो/१९९/२०१६—१७
दिनांक :— ०९ जुन, २०१६

प्रति,
प्राचार्य, मुंबई विद्यापीठ संलग्न सर्व महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना कक्ष.

माननिय महोदय/महोदया,

राष्ट्रीय सेवा योजना हा शैक्षणिक विश्वातील युवा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन जडणघडणीमधील एक महत्वपुर्ण भाग आहे. मुंबई विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष २०१६—१७ दिनांक ०६ जून, २०१६ पासून सुरू झालेले आहे. राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठ कक्षामार्फत या शैक्षणिक वर्षासाठी खालीलप्रमाणे उपक्रम आपल्या रा.से.यो. एककामार्फत राबवण्यात यावेत.

**१) जागतिक योग दिन :—** दिनांक २१ जून, २०१६ हा दुसरा जागतीक योग दिवस जगभर साजरा केला जाणार आहे. जागतीक योग दिवस साजरा करण्यासाठी मा. कुलगुरूंच्या निर्देशाप्रमाणे खालीलप्रमाणे उपक्रम राबवण्यात यावेत.

अ) जागतिक योग दिवस निमित्ताने विविध उपक्रम राबविण्यात यावेत. महाविद्यालयीन पातळीवर विद्यार्थ्यांसाठी ३ ते ५ दिवसांचे शिबीर आयोजित करून सदर शिबिराचा समोरोप दिनांक २१ जून, २०१६ रोजी ''जागतीक योग दिवस'' या दिवशी करण्यात यावा.

ब) महाविद्यालयाच्या रा.से.यो. एककाने दत्तक घेतलेल्या गावी काही निवडक स्वयंसेवक पाठवून जागतीक योग दिवस ग्रामस्थांसाठी साजरा करण्यात यावा. यामध्ये योगासंदर्भात व्याख्यान, चित्रफित, भिंतीपत्रक, योगप्रात्याक्षिक इ. चे आयोजन करण्यात यावे. जागतीक योग दिवस साजरा करण्यासाठी पतंजलि योग समीती, कैवल्यधाम योग संस्था किंवा योग शिक्षण देणाऱ्या इतर संस्थांची मदत घ्यावी.

क) विद्यापीठस्तरीय योग दिवस उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयांच्या सहभागाबाबत आपणास संबंधित रा.स.यो. जिल्हा समन्वयकांद्वारे कळविण्यात येईल.

**२) आपत्ती व्यवस्थापन कक्ष :—** आधुनिक युगात नागरीकांना आपतकालीन प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. मा. राज्य संपर्क अधिकारी, मंत्रालय कक्ष यांच्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक रा.से.यो. एककाने आपतकालीन व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे. आपल्या महाविद्यालयातील रा.से.यो. एककातर्फे ३० स्वयंसेवकांचा आपतकालीन कक्ष स्थापन करावा. सदरील ३० स्वयंसेवकांना नागरी संरक्षण दल, अग्नीशमन दल, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष इ. यंत्रणा मार्फत प्रशिक्षण देण्यात यावे.

...२/—

**३) Eco Club (ईको क्लब) :-** पर्यावरणाचा झालेला ऱ्हास पहाता पर्यावरणाचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे. मा. राज्य संपर्क अधिकारी रा.से.यो. मंत्रालयीन कक्ष यांच्या निर्देशाप्रमाणे रा.से.यो. एककाने Eco Club स्थापन करून स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, गांडूळ खत निर्मिती, कंपोस्ट खत निर्मिती इ. उपक्रम राबवण्यात यावेत.

**४) वनमहोत्सव :–** रा.से.यो. कक्षातर्फे दरवर्षी पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण मोहिम हाती घेतली जाते. पर्यावरणाचे संरक्षण व्हावे म्हणून शासनाने या वर्षी १ ते ७ जुलै, २०१६ – वनमहोत्सव या सप्ताहात दोन कोटी वृक्ष लावण्याचे निश्चित केले आहे. सदर वृक्षारोपणासाठी विद्यापीठ, महाविद्यालये यातील विद्यार्थी व शिक्षक इतर स्वयंसेवी संस्था यांनी सहभाग घ्यावा अशी सुचना केली आहे. राष्ट्रीय सेवा योजना संदर्भात सर्व महाविद्यालयीन रा.से.यो. एककांनी आपल्या विद्यार्थी स्वयंसेवक संख्येप्रमाणे वृक्षारोपण करून त्याची निगा राखण्याची जबाबदारी घ्यावी व संबंधित अहवाल विद्यापीठ रा.से.यो. कक्षाकडे पाठविण्यात यावा. वृक्षारोपाचे स्थळ, संख्या, सहभागी विद्यार्थी संख्या, रोपांचे प्रकार इ. माहिती अहवालात नमूद करण्यात यावी. वृक्षारोपण करण्यासाठी आवश्यक असलेली रोपांच्या उपलब्धतेसाठी आपल्या परिसरातील नगरपालिका, नगरपरिषद, महानगरपालिका, सामाजिक वनिकरण रोपवाटीका यांच्याशी संपर्क साधवा.

**५) मतदार नोंदणी/जागृती अभियान :–** येत्या वर्षात येणाऱ्या नगरपालिका, महानगरपालिका यांचे निवडणूकी दरम्यान नवमतदारांची नोंदणी व मतदान जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. सर्व रा.से.यो. स्वयंसेवकांची मतदान नोंदणी पूर्ण करून घेण्यात यावी तसेच महाविद्यालयातील इतर विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मतदार नोंदणीसाठी उपक्रम राबविण्यात यावा. तसेच दत्तक गाव/वस्ती यामध्ये प्रसार फेऱ्या आयोजित करून मतदार नोंदणी व मतदान जागृती यासाठी कार्य करावे.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी)

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रासेयो विभाग